# उपसंहार

# उपसंहार

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ साली पोरबंदर (राजकोट) येथे झाला. भारतीय इतिहासातील १९२० ते १९४८ हा काळ मुख्यत्त्वेकरून गांधीयुग म्हणून ओळखला जातो. गांधी ईश्वरनिष्ठ होते. ईश्वराविषयी श्रध्दा त्यांच्यात बिंबली होती. सत्य, अहिंसा व सत्याग्रह हे गांधीजींच्या जीवनातील तत्त्वज्ञान होते.

सत्य व अहिसेंच्या माध्यमातून स्वराज्य प्राप्ती हा महात्मा गांधीजींचा जीवनमार्ग असून त्याची दिशा मानवतेकडे जाण्याची होती. हिंदी लोकांचे ऐक्य हे गांधीजींचे जीवित कार्य होते. हिंदू–मुस्लिम ऐक्याला गांधींनी यज्ञ म्हटले आहे. कारण या दोन समूहातील ऐक्याशिवाय स्वराज्यप्राप्ती अशक्य आहे, अशी त्यांची मनोमन भावना होती. वयाच्या बाराव्या वर्षीच या विषयाचा ध्यास गांधींना लागला होता. रचनात्मक कार्यक्रमातील एक अभिन्न अंग म्हणून हिंदू–मुस्लिम ऐक्याला सर्व राष्ट्रीय ऐक्य म्हणून संबोधतात. जातीनिष्ठतेपेक्षा देशनिष्ठा श्रेष्ठ आहे. ऐक्यासाठी समान हेतू, समान ध्येय व समान सुख–दुःखे असली पाहिजेत. हिंदू–मुस्लिम ऐक्याशिवाय स्वराज्यप्राप्ती शक्य नाही. म्हणून प्रत्येकाने शेजार धर्मानुसार सहकार्याने परस्परांत ऱ्हदय परिवर्तन करणे गरजेचे आहे, असे गांधीजींचे मत होते.

इ. स. १८८५ साली 'राष्ट्र सभे'ची स्थापना झाली. त्यामध्ये समाविष्ठ सर्व जात, धर्म, वंशाचे लोक राष्ट्रवादाच्या जागृतीतून एकत्र आले. परंतु हिंदू राष्ट्रवाद व मुस्लिम राष्ट्रवाद असा द्विराष्ट्रवाद निर्माण झाल्याने भारताच्या राष्ट्रवादाला नवे आव्हान प्राप्त झाले. धर्माधिष्ठीत राष्ट्रवादाची मांडणी करण्यात

जीना व सावरकर अग्रस्थानी होते. हिंदू–मुस्लिम ही दोन स्वतंत्र राष्ट्रे असून ती एकत्रित नांदणे शक्य नाही असा युक्तिवाद जीना व सावरकर करू लागले. पण यांस अप्रत्यक्षरित्या खतपाणी ब्रिटीशांनी घातले. हिंदू–मुस्लिम यांच्या बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक असा भेद करून त्यांच्या भावनिक, धार्मिक, आचार–विचार, परंपराविषयक पृथकतेची भावना चेतविण्यात आली. त्याद्वारा राष्ट्रसभेला कमजोर करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. भारतावरील आपली मगरमिठी कायम ठेवण्यासाठी 'फूट पाडा व राज्य करा' हे त्यांनी धोरण अवलंबिले, त्यामुळे अनेक वेळा जातीय दंगली व हिंसा यांचा मोठया प्रमाणात आगडोंब उसळला.

हिंदू–मुस्लिम हे जन्मजात शत्रू नसून इतिहास काळापासून ते एकत्र आनंदात नांदत आले आहेत. पण धर्माला ब्रिटीशांनी जमातवादाचा आशय दिला, यास भारतीय बळी पडले. ही भारताच्या इतिहासातील शोकांतिक आहे. धर्माच्या नावावर राष्ट्राची निर्मिती करणारे काही संकुचित राष्ट्रवादी त्यावेळी उदयास आले, हे त्यांच्या मागास संस्कृतीचे लक्षण होते. ब्रिटीशांनी दुहीची बीजे पेरल्यामुळे जमातवादाचे अग्नी भडकत राहणे स्वाभाविक होते. विशेषतः १९४६–४७ मध्ये जमातवादी दंगे होवून लाखो लोक निराश्रीत झाले आणि धर्माच्या आधारावर भारताची फाळणी झाली.

अशा परिस्थितीत महात्मा गांधींनी १९२० पासून हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न आरंभिले होते. जातीनिष्ठतेपेक्षा देशनिष्ठा श्रेष्ठ आहे, हिंदू–मुस्लिम या दोन समुहातील ऐक्य राष्ट्रीय अखंडता, स्वावलंबन, स्वातंत्र्य व स्थैर्यासाठी आवश्यक आहे. यामुळे हिंदू–मुस्लिम यांच्यात संघर्ष, शस्त्राचा वापर करणे अमानवीय असून मानवी संस्कृतीच्या विरोधात आहे. एक राष्ट्र निर्माण करायचे असेल तर आपल्याला अहिंसक माध्यमातून परिवर्तन करणे गरजेचे आहे. असे

गांधीजींचे मत होते. याच ध्येयाने गांधींनी हिंदू–मुस्लिम ऐक्य स्थापण्यासाठी अविरत प्रयत्न केले. विशेषतः १६ ऑगस्ट १९४६ पासून जमातवादी दंगे शमविण्यासाठी नोआखली, बिहार, कलकत्ता आणि दिल्ली येथे अहिंसक सत्याग्रहीच्या रूपाने प्रांतोप्रांत अनवाणी फिरले परंतु जमातवादाच्या या विकृतीचे पर्यवसान महात्मा गांधींच्या खूनात झाले.

## शोधप्रबंधाची प्रकरण योजना :

प्रस्तुत संशोधनाची मांडणी पाच प्रकरणांत करण्यात आलेली आहे.

१. विषय प्रवेश.

२. हिंदु मुस्लीम ऐक्याचा प्रश्न

३. महात्मा गांधी आणि हिंदु मुस्लीम ऐक्य – १९३० – १९४६.

४. हिंदु मुस्लीम ऐक्याचे प्रयोग – १९४६ – १९४८.

५. टीकात्मक अभ्यास.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत हिंदू–मुस्लिम ऐक्याचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा होता. जमातवादाच्या विकृतीमुळे भारताच्या राष्ट्रवादासमोर एक प्रकारचे आव्हान निर्माण झालेले होते. हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न करण्याचे कार्य अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांनी केले. परंतु जमातवादाचा हा प्रश्न सुटू शकला नाही व आजपर्यंत हा जमातवादाचा प्रश्न वेगवेगळया स्वरूपात भारताच्या प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये निर्माण होताना आपल्याला दिसून येतो. जमातवादाच्या विकृतीमुळे निष्पाप लोकांचे बळी त्यात पडले. लाखो लोकांना निराश्रीत व्हावे लागले. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींनी हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रयत्न केले. काही प्रमाणात हे ऐक्य स्थापन करण्यात त्यांना यश आले. परंतु पूर्णतः ऐक्य

स्थापन करण्यात त्यांना यश मात्र आले नाही. महात्मा गांधींनी जमातवादी संघर्ष सोडविण्यासाठी केलेल्या कार्याचे, योगदानाचे विवेचन आणि विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधामध्ये केलेला आहे.

## प्रकरण पहिले – विषय प्रवेश

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारतावरील इंग्रजी राजवटीची स्थापना आणि त्याच्या परिणामाची चर्चा करण्यात आली आहे. इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांच्या अन्यायी, स्वार्थी व दडपशाही राजवटीने हिंदी जनतेची मोठया प्रमाणात धुळदाण उडाली. इंग्रजी राज्याच्या आधुनिक शिक्षण, भौतिक सुधारणा आणि सुधारलेली राज्यव्यवस्था यामुळे भारतात प्रबोधनाच्या चळवळी निर्माण झाल्या. या प्रबोधनाच्या चळवळीतून उदारमतवादी राष्ट्रवादाची भावना भारतीय जनमानसांत निर्माण झाली. याची परिणती १८८५ मध्ये राष्ट्रसभेच्या स्थापनेत झाली. परंतु भारताच्या राष्ट्र निर्मितीच्या प्रकियेमध्ये ब्रिटीशांच्या भेदनीतीमुळे जमातवादाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सर सय्यद अहमद यांच्यासारख्या मुस्लिम पुढाऱ्याने राष्ट्रसभाविरोधी भूमिका घेवून पृथक मुस्लिम अस्मिता जोपासण्याचा प्रयत्न केला.

## प्रकरण दुसरे – हिंदु मुस्लीम ऐक्याचा प्रश्न

प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंदू – मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नासंबंधी निर्माण झालेल्या वेगवेगळ्या प्रवाहांची चर्चा करण्यात आलेली आहे. हिंदू जमातवादाचा उदय व संघर्षाची कारणे ब्रिटीशांची भूमिका या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकातील हिंदू–मुस्लिम संबंध आणि जमातवाद यांचा अभ्यास यांत केला आहे. लोकमान्य टिळकांनी १९१६ साली प्रसिध्द लखनौ करार करून कॉंग्रेस – लीग सहकार्य

प्रस्थापित केले. परंतु हे सहकार्य फार दिवस टिकले नाही. महात्मा गांधींनी १९२० च्या असहकार चळवळीमध्ये खिलाफत प्रश्नांचा समावेश करून हिंदू–मुस्लिम ऐक्य स्थापन करण्याचे प्रयत्न केले. पण १९१६ नंतर जमातवाद पुन्हा वाढल्याने हे ऐक्य प्रस्थापित होवू शकले नाही. ब्रिटीशांनी विमक्त मतदार संघांच्या माध्यमातून दुहीची बीजे पेरून हिंदू–मुस्लिमांमध्ये फूट पाडली.

## प्रकरण तिसरे – महात्मा गांधी आणि हिंदु मुस्लीम ऐक्य – १९३०–४६

प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंदु – मुस्लीम प्रश्नाचा १९३० ते ४६ या दरम्यानच्या घटनांचा परामर्श घेतलेला आहे. १९२९ साली पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव एकमताने मंजूर झाला. गांधींनी १९३० साली सायमन आयोगाच्या विरोधात सविनय कायदेभंगाची चळवळ करून इंग्रजी शासनाला आव्हान दिले. गांधी–आयर्विन कराराने गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर झाले. परंतु भारतीयांची स्वातंत्र्यांची मूलभूत मागणी ब्रिटीशांनी मान्य न केल्याने गांधी भारतात परतले. १९३२ साली ब्रिटीशांनी जातीय निवाडा जाहीर केला. याविरोधात गांधींनी आमरण उपोषण केले. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गांधी यांच्यात प्रसिध्द पुणे करार होवून विमक्त मतदार संघाचा पर्याय म्हणून राखीव जागांचा स्वीकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. १९३५ ला भारत सरकारचा कायदा तयार करण्यात आला. त्यामध्येही ब्रिटीशांनी "फोडा व झोडा" ची नीती अवलंबली. या कायद्यान्वये १९३७ ला झालेल्या निवडणुकीत मुस्लिम लीगला मुस्लिम बहुसंख्यांक प्रांतात सरकार बनविण्यात अपयश आल्याने लीगची जमातवादी भूमिका अधिक आक्रमक होत गेली. इ. स. १९३९ साली ब्रिटीशांनी भारतीयांना विश्वासात न घेता भारतास युध्दात सामील करून घेण्याच्या निषेधार्थ कॉंग्रेसच्या सरकारांनी राजीनामे दिले. याच दरम्यान

मुस्लिम लीगने १९४० ला पाकिस्तानचा ठराव करून कॉंग्रेस विरोधी भूमिका आक्रमकपणे मांडण्यास सुरूवात केली. १९४२ ला महात्मा गांधींनी क्रिप्स मिशनच्या विरोधात 'चले जाव' चळवळ सुरू केली. चर्चिल यांच्या साम्राज्यवादी धोरणांमुळे सरकारने गांधी, नेहरूंसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना अटक करून चळवळ दडपली. १९४४ ला गांधी–जीना बैठक जीनांच्या अतिरेक मागणीने असफल ठरली. कॅबिनेट मिशन, लॉर्ड वेव्हेल यांनी मांडलेल्या प्रस्तावाचा हिंदू–मुस्लिम पुढाऱ्यांनी स्वीकार न केल्याने अयशस्वी ठरली. १९४६ साली १९३५ च्या कायद्यान्वये निवडणुका झाल्या. लीगला निवडणुकीत चांगले यश मिळाले. मुस्लिम प्रादेशिक पक्षांचा लीगमध्ये समावेश व ब्रिटीशांच्या सहकार्याने लीगने जमातवादी राजकारण केल्याने हिंदू–मुस्लिम संबंध आणखीनच दुरावले.

## प्रकरण तिसरे – हिंदु मुस्लीम ऐक्याचे प्रयोग – १९४६–४८

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९४६–४८ मधील घटनांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. जून १९४६ नंतर ब्रिटीशांनी भारत सोडून जाण्याचे ठरविल्यानंतर लीगने आक्रमक भूमिका घेतली. या काळात वेव्हेलने अंतरिम सरकारची स्थापना करण्यास नेहरू–जीना यांच्यासमोर प्रस्ताव ठेवला. पण लीगने सरकारशी सहकार्य न करता १६ ऑगस्ट १९४६ नंतर 'प्रत्यक्ष कृती'चा मार्ग अवलंबला. पश्चिम बंगाल, नोआखली, कलकत्ता येथे मुस्लिमांनी अल्पसंख्यांक हिंदू लोकांची हत्त्या, बलात्कार, जाळपोळ, सार्वजनिक विध्वंस करून जमातवाद वाढविला. लीगने पंजाब सरकारविरोधी भूमिका घेवून तेथील युनियानिष्ट सरकारला दडपण्याचा प्रयत्न केला. परिणामी बिहारमध्ये हिंदू लोकांनी नोआखली, पश्चिम बंगाल प्रतिक्रिया स्वरूपी मुस्लिम लोकांची हत्त्या, जाळपोळ, बलात्कार केले. अशा परिस्थितीत महात्मा गांधीजी हिंदू मुस्लिम जातीय सलोख्यासाठी प्रांतोप्रांती

अनवाणी फिरू लागले. आपल्या अहिंसक सत्याग्रहीच्या मार्गाने शांततेचा व सद्‌भावनेचा संदेश देवू लागले. पण जमातवादाचे विकृत रूप आटोक्यात न आल्याने कॉंग्रेस पुढाऱ्यांनी फाळणीस मान्यता दिली. फाळणीस गांधींचा विरोध होता परंतु कॉंग्रेसने फाळणीला मान्यता दिल्याने गांधींनी फाळणी स्वीकारली. कारण वयाच्या ७७ व्या वर्षी पुन्हा चळवळ करणे अव्यवहार्य ठरेल असे त्यांना वाटले. त्यांच्या समोर पहिले आव्हान हिंदू–मुस्लिम जमातवाद थांबविणे हे असल्यामुळे महात्मा गांधींनी सक्रिय राहून कार्य केले. या काळात महात्मा गांधींनी बंगाल व बिहारमधील दंगलग्रस्त भागांना भेटी दिल्या, पदयात्रा काढल्या आणि परिस्थितीस मोठया प्रमाणात नियंत्रित केले. पंजाबचा विचार करता गांधींमुळे बंगाल बराचसा शांत राहिला.

फाळणीनंतर लाखो लोक निराश्रीत, स्थलांतरित झाले. शेवटच्या काळात गांधीजींचा मार्ग चोखाळण्यास बहुतेक राष्ट्रीय पुढारी तयार नव्हते. गांधीजींचा सल्ला त्यांना आता अव्यवहार्य वाटू लागला. परिणामी जमातवादाच्या अग्नीकुंडात गांधीजींची आहुती गेली. या महामानवाने हिंदू–मुस्लिम ऐक्य स्थापण्याचा प्रयत्न करताना त्यांचा जीवित उद्‌देश मात्र अधुरा राहिला.

## प्रकरण पाचवे – टीकात्मक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंदू–मुस्लिम प्रश्नांचा टीकात्मक अभ्यास करण्यात आला आहे. १९४०–४६ या काळात हिंदू–मुस्लिम प्रश्नाचे स्वरूप पूर्णतः राजकीय व आर्थिक स्वरूपाचे होते. मुस्लिम लीगने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करून ब्रिटीशांच्या सहकार्याने आक्रमक भूमिका घेतली मात्र कॉंग्रेसने विधायक विरोधाची भूमिका घेवून भारताच्या स्वातंत्र्याची मागणी केली. परंतु शेवटच्या टप्प्यात मुस्लिम लीगच्या असहकार्याने जमातवाद वाढला. यावेळी ब्रिटीशांनी

तटस्थतेची भूमिका घेवून साम्राज्यवादी नीती अवलंबली, कारण त्यांना भारतावरील आपली मगरमिठी सोडावयाची नव्हती. या सर्व मंथनाचा परिपाक म्हणजे भारताची फाळणी होय. फाळणीप्रसंगी गांधीजींनी नैतिक, अध्यात्मिक व अहिंसेच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम यांच्यात सलोखा निर्माण करण्याचे प्रयत्न केले. राजकीय व आर्थिक सत्तेच्या लालसेपोटी जमातवाद वाढलेला होता. या काळात महात्मा गांधींनी शांतता स्थापन करण्यासाठी आपले जीवन पणास लावले व त्या भागात शांतता प्रस्थापित केली. महात्मा गांधींच्या उपोषणामुळे अनेकांचे ऱ्हदय परिवर्तन झाले. यानंतर पंजाब प्रांतात जीना यांच्या निमंत्रणावरून शांतता स्थापन करण्यासाठी जाणार होते. पण दुर्देवाने ते शक्य झाले नाही.

महात्मा गांधींनी हिंदू–मुस्लिम प्रश्नासंबंधी आणि जमातवादी दंग्यांच्या सोडवणुकीसाठी अहिंसा, प्रेम आणि मानवतेचा जो नवा संदेश दिला, हा संदेश सबंध भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला सुध्दा मार्गदर्शक ठरेल यात तीळमात्र शंका नाही.